14 JAN 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ सामाजिक वंचितता अभ्यास केंद्रास 'यूजीसी'कडून दोन कोटींचा निधी

## राज्यातील एकमेव अभ्यास केंद्र; विविध उपक्रमांना मिळणार गती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रास विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) यांच्याकडून २ कोटी १ लाख ७२ हजार ४५९ रुपये निधी प्राप्त झाला आहे. महाराष्ट्रात विद्यापीठीय स्तरावर कार्यरत असलेले ते एकमेव अभ्यास केंद्र आहे.

देशात सामाजिक वंचितता व समावेशनचा अभ्यास सुरू व्हावा या दृष्टीने ११ व १२ पंचवार्षिक योजनेत आर्थिक तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व विद्यापीठ अनुदान आयोग यांनी सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रांची निर्मिती केली आहे. भारतात पहिल्या टप्प्यात १३ अभ्यास केंद्रांना विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजुरी दिली होती. त्यात शिवाजी विद्यापीठातील केंद्राचा समावेश आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

अभ्यास केंद्राचा २०१२ पासूनचा निधी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे प्रलंबित होता. त्यानुसार २०१२-१३ ते २०१८-१९ कालावधीचा संपूर्ण निधी यूजीसीकडून प्रदान करण्यात येत असल्याचे पत्र विद्यापीठ प्रशासनास प्राप्त झाले आहे. अभ्यास केंद्राचा प्रलंबित निधी मिळविण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. या निधीमुळे अभ्यास केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमास व वंचित घटकांच्या संदर्भातील संशोधन कार्यास गती मिळेल, असा विश्वास केंद्राचे संचालक डॉ. जगन कराडे यांनी व्यक्त केला.

### केंद्राने शैक्षणिक, संशोधनपर उपक्रम राबविले

सामाजिक वंचितता व समावेशन अभ्यास केंद्राने स्थापनेपासून आजपर्यंत समाजातील वंचित, दलित आदिवासी, भटक्या-विमुक्त जमाती, मुस्लिम, ख्रिश्चन, स्त्रिया, देवदासी, वाघ्या-मुरळी, अपंग शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अल्पसंख्याक, अंधश्रद्धा निर्मूलन आदी महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर शैक्षणिक, संशोधनपर उपक्रम राबविले आहेत. त्याचबरोबरच सामाजिक वंचितता व समावेशक धोरण विषयात पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू केला आहे.

14 JAN 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात ९९ टक्के लसीकरण

## कोव्हिड लसीकरणाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कोव्हिड-१९ विषयक लसीकरणास शासनाने केलेल्या आवाहनानुसार १०० टक्के सहभाग दर्शविला. दोन्ही डोस घेणाऱ्या शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या अनुक्रमे ९७ व ९९ टक्के आहे, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

केंद्र व राज्य सरकारने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना लसीकरणासंदर्भात आवाहन केले. त्यानुसार विद्यापीठ प्रशासनाने सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना



शिवाजी विद्यापीठातून...

लसीकरण करून घेण्याच्या सूचना केल्या. महापालिका आरोग्य विभागातर्फे विद्यापीठात आयोजित लसीकरण शिबिरास प्रतिसाद लाभला. विद्यापीठात कार्यरत २६० शिक्षकांपैकी २१६ जणांनी (८३.०७ टक्के) दोन्ही डोस घेतले आहेत. ३७ जणांनी (१४.२३) पहिला डोस घेतला असून, ते दुसऱ्या डोससाठी मुदतपूर्तीच्या प्रतीक्षेत आहेत. विद्यापीठातील ५३४ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी ४६८ (८७.६४) जणांनी दोन्ही डोस घेतले असून, ६२ जण (११.६१) पहिला डोस घेऊन दुसऱ्या डोससाठी मुदतपूर्तीच्या प्रतीक्षेत आहेत. एकही डोस न घेतलेल्या शिक्षकांची संख्या सात व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या चार आहे. यातील काहीजण कोव्हिड पॉझिटिव्ह होते.

काहींनी वैद्यकीय कारणास्तव लस घेतलेली नाही. तथापि, वैद्यकीय सल्ल्यानंतर लसीकरणासंदर्भात निर्णय घेऊ, असे त्यांनी प्रशासनाला कळविल्याचे कुलसचिव डॉ. शिंदे यांनी सांगितले.

14 JAN 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कमला कॉलेजला 'स्वायत्त' दर्जा

## शिवाजी विद्यापीठाचे पत्र : युजीसीकडून मिळाली मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजला विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) सन २०२२ ते २०२३ या कालावधीसाठी स्वायत्ता दिली आहे. त्यानुसार अधिकार मंडळांच्या मान्यतेनंतर शिवाजी विद्यापीठाने या स्वायत्ततेबाबतचे पत्र कॉलेजला गुरुवारी दिले.

स्वायत्ता मिळणारे कमला कॉलेज हे शहरातील चौथे महाविद्यालय ठरले आहे. यापूर्वी विवेकानंद कॉलेज, महावीर महाविद्यालय, डीआरके कॉमर्स कॉलेजला स्वायत्तता मिळाली आहे. स्त्री शिक्षणाला बळ देण्याच्या उद्देशाने कोल्हापूर शहरात सन १९८४ मध्ये ताराराणी विद्यापीठाने कमला कॉलेज सुरू केले. सध्या कनिष्ठ आणि वरिष्ठ या विभागातून सुमारे २५०० विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. नॅकचे 'अ' मानांकन मिळाल्यानंतर, स्वायत्ततेसाठी या कॉलेजने गेल्यावर्षी एप्रिलमध्ये यूजीसीला प्रस्ताव सादर केला होता. त्यावर दि. ३० आणि ३१ ऑक्टोबरमध्ये यूजीसीच्या सहा सदस्यीय समितीने कॉलेजला भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर दि. ३ डिसेंबर रोजी यूजीसीच्या समितीची बैठक झाली. त्यामध्ये कॉलेजला स्वायत्तता देण्याचा निर्णय झाला. त्याबाबतचे पंत्र कॉलेजला दि. ७ डिसेंबरला मिळाले. स्वायत्ततेबाबत व्यवस्थापन आणि विद्यापरिषद या अधिकार मंडळांनी मान्यतेचा ठराव केला. त्यानंतर विद्यापीठाने गुरुवारी स्वायत्ततेबाबतचे पत्र कॉलेजला दिले.



> ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक डॉ. व्ही. टी. पाटील यांनी कमला कॉलेजची स्थापना केली. आता कॉलेजला स्वायत्तता मिळाल्याने आमची जबाबदारी वाढली आहे. स्थानिक परिसर आणि समाजाच्या गरजांचा विचार करून आता आम्हाला अभ्यासक्रमाची रचना करता येणार आहे. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने नवीन काही अभ्यासक्रम सुरु केले जातील.
>
> **- डॉ. क्रांतिकुमार पाटील,**
> कार्यकारी अध्यक्ष, ताराराणी विद्यापीठ

### कॉलेज दृष्टिक्षेपात

**१९८४**
स्थापना

- कनिष्ठ विभाग : कला, वाणिज्य, विज्ञान
- वरिष्ठ विभाग : कला, वाणिज्य, बी. व्होक, पदव्युत्तर अभ्यासक्रम

**२५००**
एकूण विद्यार्थिनी



14 JAN 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात हंगामी पदांसाठी आजपासून समक्ष मुलाखती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने डीएसटी-पर्स फेज २ व रुसा प्रकल्पांतर्गत हंगामी पदांसाठी शुक्रवारपासून (दि. १४) समक्ष मुलाखतींचे आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या १६ डिसेंबर २०२१ रोजीच्या जाहिरातीनुसार २४ डिसेंबर रोजी डी.एस.टी.-पर्स फेज २ व रुसा या प्रकल्पाअंतर्गत हंगामी पदांच्या समक्ष मुलाखतींचे आयोजन केले होते. तथापि, २३ डिसेंबर रोजीच्या परिपत्रकानुसार या मुलाखती पुढे ढकलण्यात आल्या होत्या. त्यानुसार आजपासून मुलाखतींचे नियोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी (दि.१४) डी.एस.टी-पर्सअंतर्गत संगणकचालक तथा क. साहाय्यक (खुला), शनिवारी (दि. १५) फेज २ - संगणकचालक तथा क. साहाय्यक (अनु. जाती), सोमवारी (दि. १७) रुसाअंतर्गत रोजंदारी कनिष्ठ लेखनिक पदाच्या मुलाखती होणार आहेत.

तरुण भारत

# विद्यापीठात हंगामी पदांसाठी आजपासून मुलाखती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील हंगामी पदासाठी २४ डिसेंबर २०२१ रोजी होणाऱ्या मुलाखती पुढे ढकलण्यात आल्या होत्या. विद्यापीठ प्रशासनाने डीएसटी-पर्स फेज-२ आणि रूसा प्रकल्पांतर्गत हंगामी पदांसाठी आज, शुक्रवार १४ पासून मुलाखतीला सुरूवात होत आहे. कोरोनाच्या नियमांचे पालन करून उमेदवारांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

डी. एस. टी. पर्स फेज-२ संगणकचालक तथा कनिष्ठ सहाय्यक (खुला प्रवर्ग) : १४ जानेवारी रोजी तर संगणकचालक तथा कनिष्ठ सहाय्यक (अनुसुचित



जाती) १५ जानेवारी रोजी मुलाखती होणार आहेत. तसेच रुसा प्रकल्पांतर्गत हंगामी रोजंदारी कनिष्ट लेखनिक : १७ जानेवारी रोजी मुलाखत पार पडणार आहे.

सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारतीजवळ उपस्थित राहणे बंधनकारक आहे. कागदपत्रांबरोबर अर्जासोबत उमेदवारांनी दोन्ही लस घेतल्याचे प्रमाणपत्र किंवा ७२ तासांपूर्वीची आरटीपीसीआर चाचणीचा निगेटिव्ह अहवाल जोडणे आवश्यक आहे.